राज्यातील प्राविण्यप्राप्त खेळाडूंना शासकीय निमशासकीय व इतर क्षेत्रात नोकरीसाठी ५% आरक्षण

सर्व समावेशक सूचना.

**महाराष्ट्र शासन**

**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**

**शासन निर्णय क्रमांक: राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक

मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-४०००३२

दिनांक: १६ नोव्हेंबर, २०१७.

**वाचा:**

१. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक :राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक ०१ जुलै,२०१६.

२. शासन शुध्दीपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक:राक्रीधो२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १८ ऑगस्ट,२०१६.

३. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक : संकीर्ण १७१७/प्र.क्र.३९/क्रीयुसे-२ , दिनांक १७ मार्च, २०१७.

४. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक : संकीर्ण १७१७/प्र.क्र.३९/क्रीयुसे-२ , दिनांक २७ मार्च, २०१७.

५. शासन शुध्दीपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक:राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १० ऑक्टोबर, २०१७.

६. शासन शुध्दीपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक:राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १५ नोव्हेंबर, २०१७.

**शासन निर्णय:**

उपरोक्त संदर्भाधीन शासन निर्णयांन्वये, राज्यातील प्राविण्यप्राप्त खेळाडूंना शासकीय, निमशासकीय व इतर क्षेत्रात नोकरीसाठी ५% आरक्षणाच्या सर्व समावेशक सूचना देण्यात आल्या आहेत. संदर्भाधीन शासन शुध्दीपत्रक क्र.०५ व ०६ मध्ये “हे आदेश शासन शुध्दीपत्रक निर्णयाच्या दिनांकानंतर होणाऱ्या भरतीस लागु राहतील” असे नमूद करण्यात आले आहे. या तरतुदीमुळे खेळाडू उमेदवारांमध्ये संभ्रम निर्माण झाल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे. त्यामुळे उपरोक्त तरतुदीचे अधिक स्पष्टीकरण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार याबाबत खालीलप्रमाणे स्पष्टीकरण करण्यात येत आहे.

२. संदर्भाधीन शासन शुध्दीपत्रक दि.१० ऑक्टोबर, २०१७ मधील परिच्छेद क्रमांक ०३ व शासन शुध्दीपत्रक दि.१५ नोव्हेंबर, २०१७ मधील परिच्छेद क्रमांक ०२ मध्ये नमूद “हे आदेश शासन शुध्दीपत्रक निर्णयाच्या दिनांकानंतर होणाऱ्या भरतीस लागु राहतील” या तरतुदीचा अर्थ “दि.१० ऑक्टोबर, २०१७ पूर्वी निवड प्राधिकरणाने नियुक्तीसाठी अंतिम यादी जाहीर न केलेल्या, ५ टक्के खेळाडू आरक्षण लागू असणाऱ्या पदांवरील नियुक्तीकरीता लागू राहतील.”

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१११६१५५६३०७८२१ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2017.11.16 15:59:02 +05'30'

**(राजेंद्र पवार)**

उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. मा.राज्यपालांचे सचिव.
२. मा.मुख्यमंत्र्याचे सचिव.
३. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
४. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य .
५. आयुक्त, क्रीडा व युवकसेवा,महाराष्ट्र राज्य,पुणे.
६. संचालक, शिक्षण (प्राथमिक/माध्यमिक), महाराष्ट्र राज्य,पुणे.
७. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
८. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.
९. लोकायुक्त, महाराष्ट्र, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,मुंबई.
१०. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा व अनुज्ञेयता),मुंबई/नागपूर.
११. अधिदान व लेखाधिकारी,मुंबई.
१२. निवासी लेखा परीक्षा अधिकारी,मुंबई.
१३. सर्व मंत्रालयीन विभाग.
१४. सर्व मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील कार्यालय प्रमुख/विभाग प्रमुख.
१५. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
१६. सर्व शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद.
१७. सर्व उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा, महाराष्ट्र राज्य.
१८. महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय,मुंबई.
१९. सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी.
२०. निवड नस्ती, क्रीयुसे-२.